-

MHND180002732026

## नियमीत दिवाणी दावा क्र.१५/२०२६ मधील

## निशाणी क्र.१७ खालील आदेश

प्रस्तुतचा दावा वादीने तो दावा मिळकतीचा मालक असल्याचे आणि त्यामध्ये प्रतिवादींचा कोणताही हक्क व हितसंबंध नसल्याचे ठरवून मिळण्याकरीता आणि कायमस्वरुपी मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता मौजे किनवट, ता. किनवट, जि.नांदेड येथील नगर परिषद जुना मालमत्ता क्रमांक ९० ज्याचा चालू मालमत्ता क्रमांक १७–२६ व १७–२७ या मिळकतीवरील प्रत्येकी २४०० चौ.फुटाची दोन गोडाऊन व त्या गोडाऊनच्या समोरील भागातील प्रत्येकी दोन खोल्या आणि त्या गोडाऊनच्या समोर जाण्या येण्यासाठी असलेला १० फुटाचा रस्ता ही मिळकत वाद मिळकत म्हणून दर्शवलेली आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकती या त्याने स्वःकष्टातून खरेदी घेतलेल्या आहेत. त्यावर त्याने स्वतः नगरपालिकेची परवानगी घेवून गोडाऊन व रुम बांधलेल्या आहेत. ती मालमत्ता त्याने वेळोवेळी भाडेतत्वावर दिलेली आहे. वादीने दावा मिळकतीवर त्याचा ताबा सांगितलेला आहे. त्या ताब्याला प्रतिवादी हरकत व अडथळा निर्माण करत असल्याचे कथन केलेले आहे. त्याने प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादींनी त्याच्या दावा मिळकतीतील ताब्याला हरकत व अडथळा करु नये म्हणून जैसे थे ची परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश करण्याची विनंती केली आहे.

०३. दावा मिळकतीवर मालकी दर्शविण्यासाठी वादीने दोन खरेदीपत्राच्या छायांकीत प्रती, वाद मिळकतीचे कर आकारणी पत्रक, वीज बिल, भाडे करार, नगरपालिकेने दिलेले मालकी नोंद प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती दाखल केलेल्या आहेत. त्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी वादी

-

दावा मिळकतीचा मालक असल्याचे निदर्शनास येत आहे. प्रतिवादी क्र.०१ ने प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केलेले आहे. परंतु दावा मिळकत वादीच्या मालकीची आहे किंवा काय, ती वादीच्या ताब्यात आहे किंवा कसे याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी दावा मिळकत वादीच्याच ताब्यात आहे असे म्हणावे लागेल.

०४. वादीच्या कथनानुसार त्याने प्रतिवादी क्र.०३ ते ०५ चे वडील यांना वॉर्ड क्रमांक १७ मधील जुना मालमत्ता क्रमांक ५१, त्याचा नवीन मालमत्ता क्रमांक ३० वरील घर दिलेले आहे. त्याचप्रमाणे त्याच मालमत्तेमधील चार खोल्यांचे घर प्रतिवादी क्र.०१ ला देखील दिलेले आहे. तसेच त्यांचा तिसरा भाऊ अब्दुल लतीफ याला सिंदखेड येथील स्टोन क्रशर मधील अर्धा हिस्सा व लोकरवाडी येथील शेत भूमापन क्र.९३, शेत भूमापन क्र.११४ व सरदारनगर येथील घर दिलेले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी दिनांक १६.०४.१९९९ रोजी शपथपत्र देखील निष्पादित केलेले आहे. त्या शपथपत्राची प्रत देखील अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता वादीच्या वरील कथनांना आधार प्राप्त होत आहे. त्या शपथपत्रामध्ये प्रतिवादींना वाटून दिलेल्या मिळकती या देखील वादीच्या स्वःकमाईच्या मिळकती असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

०५. एकंदरीत अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दावा मिळकत वादीच्या ताब्यात असल्याचे दिसते. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.०२ ते ०९ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी होवून देखील ते हजर झालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फो सुनावणीचा आदेश करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.०१ याने संधी देवून देखील मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे त्याच्याविरुध्द विनाकैफियत आदेश करण्यात आला होता. तो आदेश त्याने आज रोजी नि.क्र.१४ अन्वये अर्ज दाखल करुन रद्द करुन मागितलेला आहे. अशा परिस्थितीत दरम्यानच्या कालावधीत प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादीच्या ताब्यास हरकत

-

अथवा अडथळा निर्माण केल्यास किंवा त्याला दावा मिळकतीतून बेदखल केल्यास तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज निष्फळ होईल. त्याचप्रमाणे दाव्यामध्ये गुंतागुंत देखील निर्माण होईल. सदरच्या बाबी टाळण्याकरीता प्रतिवादींविरुध्द जैसे थे ची परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश करणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| **०१** | वादीचा जैसे थे चा हुकुम मिळण्याचा अर्ज (नि.क्र.१७) मंजूर करण्यात येत आहे. |
| **०२.** | प्रतिवादींनी दावा मिळकती संदर्भात पुढील तारखेपर्यंत जैसे थे ची परिस्थिती ठेवावी. |

PRADIP MADAN MANE Digitally signed by PRADIP MADAN MANE Date: 2026.05.05 16:49:55 +0530

दिनांक :– ०५/०५/२०२६. **(पी.एम.माने)**

किनवट दिवाणी न्यायाधीश क.स्तर, किनवट

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : S.M.Chitmalwar

Court Name : Court of C.J.J.D., Kinwat

Date : 05/05/2026

Order signed by

the Presiding Officer on : 05/05/2026

Order uploaded on : 05/05/2026

XXXX